भारत सरकारचे

नविन शैक्षणिक धोरण

टोपण नाव : ओमी

-: मुद्दे :-

१. शिक्षण धोरण - भारतीय कायदा.

२. राष्ट्रीय शिक्षण धोरण - स्वातंत्र्यानंतरचे शैक्षणिक धोरण व त्याची अमंलबजावणी.

३. नवीन राष्ट्रीय धोरण - 2020.

४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020ची वैशिष्ट्ये.

५. नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वाचे मुद्दे -

- शालेय शिक्षण.
- उच्च शिक्षण.
- शिक्षक शिक्षण.
- व्यावसायिक शिक्षण.
- प्रौढ शिक्षण.
- भारतीय भाषांना चालना.
- राष्ट्रीय शिक्षण आयोग.
- राष्ट्रीय संशोधन फाउंडेशन.

६. नवीन राष्ट्रीय धोरण अमंलबजावणीसाठी नेमलेल्या समिती (committe).

७. निष्कर्ष.

८. संदर्भ.

'जग हे जागतिक खेडे ' होत असताना स माजाच्या उन्नतीसाठी डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे विचार घेऊन भारत सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे पुढची पिढी आत्मनिर्भर-भारतासाठी,नवनिर्माणासाठी सज्ज होण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणजे — **'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'** होय.

'अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण' या माणसाच्या 21 व्या शतकातील 'मुलभूत गरजा' आहेत. यातील 'शिक्षण' ही अशी गरज आहे ज्या गरजेच्या पूर्णतेने माणसाला अन्न, वस्त्र आणि निवारा या गरजांसाठी लागणारे अवलंबनतत्व कमी होते . परंतु अद्यावत शिक्षण न मिळाल्यास त्या शिक्षणाचा उपयोग नाही. याकरिता शिक्षण प्रक्रियेत सतत योग्य ते बदल घडून येणे आवश्यक असते. "शिक्षण ही अखंडपणे बदलत जाणारी एक प्रक्रिया आहे. " अन्न, वस्त्र, निवारा यांसारख्या अनेक गरजा कालानुरुप बदलत जातात. या गरजा भागवण्यासाठी सक्षम होणे प्रत्येक नागरीकाला गरजेचे आहे; त्याकरिता शिक्षण योग्य पातळीवर मिळणे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे.

भारतीय राज्यघटनेच्या राज्य धोरणाची दिशादर्शक तत्त्वे (Directive Principal of State Policy – DPSP) च्या भाग 4, कलम 45 आणि 39(एफ) मध्ये, राज्यमान्य आणि सर्वांना न्याय्य व प्रवेश-योग्य शिक्षणाची तरतूद आहे. १९७६ च्या ४२व्या घटनादुरुस्ती कायद्याने शिक्षणास राज्य यादीतून समवर्ती यादीमध्ये स्थानांतरित केले गेले.

भारतीय नागरिकांमध्ये शिक्षणाचा पुरस्कार करण्यासाठी भारत सरकारने आखलेले धोरण म्हणजे '**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण.**' भारतातील ग्रामीण व नागरी भागात प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षण कसे असावे, याची आखणी सदर धोरण करते. "१९६८ मध्ये तत्कालीन **पंतप्रधान इंदिरा गांधी** यांनी **प्रथमत: राष्ट्रीय शैक्षणिक धोरण** ठरविले." तेव्हापासून त्यात वेळोवेळी आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत. इ.स. १९४७ नंतर स्वतंत्र भारतातील नागरिकांच्या निरक्षरतेची समस्या दूर करण्यासाठी भारत सरकारने विविध कार्यक्रम आखले होते. त्यांमध्ये भारताचे 'पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुलकलाम आझाद' यांनी देशभरासाठी **'समान शैक्षणिक' पद्धत** आखून त्यावर केंद्र शासनाचे नियंत्रण आणले. त्यांनी भारतीय शिक्षणात आधुनिकता आणण्यासाठी 'विद्यापीठ शिक्षण आयोग' (डॉ. राधाकृष्णन आयोग), 'मुदलियार आयोग' (माध्यमिक शिक्षण आयोग) आणि 'कोठारी आयोग' (भारतीय शिक्षण आयोग) हे आयोग प्रस्तावित केले. "भारताचे 'पहिले पंतप्रधान पंडित नेहरू' आणि केंद्र शासन यांनी उच्च गुणवत्तेचे वैज्ञानिक धोरण आखून त्यानुसार १ सप्टेंबर १९६१ रोजी **'राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद'** ही स्वायत्त संस्था स्थापन केली." ही संस्था देशातील शालेय शिक्षणासंदर्भातील सर्व

समस्यांबाबत अभ्यास करते आणि सदर संस्थेला राज्य शासन व केंद्र शासन यांनी शैक्षणिक धोरणांच्या आखणी व कार्यवाहीबाबत सल्ला द्यावा, हे अपेक्षित असते.

श्रीमती.इंदिरा गांधी यांनी १९६४ ते १९८४ पर्यंतच्या शिक्षण आयोगांचे वृत्तांत व शिफारशी लक्षात घेऊन पूर्वीच्या धोरणांत आमूलाग्र बदल करत, 'डॉ. त्रिगुणा सेन' यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन केला. आयोगाने **'पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण'** जाहीर केले. यामध्ये 'राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक व आर्थिक विकास' साधण्यासाठी **भारतीय नागरिकांना 'समान शैक्षणिक'** संधी दिली गेली. भारतीय राज्यघटनेप्रमाणे १४ वर्षांपर्यंतच्या 'सर्व बालकांना सक्तीचे शिक्षण' आणि 'शिक्षकांच्या गुणवत्तेसाठी परिणामकारी प्रशिक्षण' यांची गरज सदर धोरणाने प्रकट केली. देशातील कुशल व अकुशल यांमधील दरी दूर होऊन प्रादेशिक भाषांच्या अध्ययनास प्रेरणा मिळावी, यांसाठी **'माध्यमिक शिक्षण आयोगाने'** संपूर्ण राज्यातील सरकारी व निमसरकारी शैक्षणिक संस्थांमार्फत शाळेचे माध्यम - **"पहिली राज्यभाषा (प्रादेशिक भाषा), दुसरी हिंदी भाषा (राष्ट्रीय भाषा) आणि तिसरी इंग्रजी भाषा (आंतरराष्ट्रीय भाषा) हे त्रिभाषासूत्र** प्रभावीपणे राबविण्याचे धोरण अमंलात आणले." तसेच भारतीय संस्कृतीचा एक भाग म्हणून शिक्षण संस्थांत 'संस्कृत' हा विषय शिकवावा, असे म्हटले. सदर धोरणाने शिक्षणावरील खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% निश्चित केला होता.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८ च्या शैक्षणिक धोरणांच्या परिणामाचा अभ्यास करण्याठी गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू ईश्वरभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली **'ईश्वरभाई पटेल पुनर्वलोकन समिती'** ची स्थापना झाली. या समितीनेही महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या.

तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी व केंद्र शासनाने १९८५ मध्ये पूर्वीच्या शैक्षणिक धोरणात आवश्यक ते बदल करून १९८६ मध्ये देशातील संपूर्ण शैक्षणिक संस्थांसाठी नवीन शैक्षणिक धोरण लागू केले. या धोरणात प्रामुख्याने **मुलींचे शिक्षण, अनुसूचित जाती (एस.सी.) व अनुसूचित जमाती (एस.टी.) यांच्यातील भेद दूर करण्यासाठी समान शिक्षणसंधी** यांवर भर दिला गेला. त्याचबरोबर त्यांनी शिष्यवृत्तींची संख्या वाढविणे , प्रौढ शिक्षण, मागास जमातींमधून शिक्षकभरती, गरीब कुटुंबांना शैक्षणिक प्रोत्साहन देऊन त्यांच्या मुलांचे नियमित शिक्षण , प्राथमिक शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी बालककेंद्री शिक्षण , प्राथमिक शिक्षण सुधारण्यासाठी **'खडू-फळा मोहीम'** इत्यादी बाबी कार्यान्वित केल्या. तसेच १९८५ मध्येच केंद्र सरकारने संसदेत कायदा करत सदर धोरणान्वये नवी दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर **'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ' (IGNU)** या संस्थेची स्थापना करून मुक्त विद्यापीठ यंत्रणा सुरू केली. आजमितीला देशात दूरशिक्षण व मुक्त शिक्षणामध्ये सर्वांत मोठी संस्था म्हणून 'IGNU'ला ओळखले जाते. विविध राज्यांमध्ये या विद्यापीठांतर्गत सुमारे १७ मुक्त विद्यापीठे , पारंपरिक विद्यापीठांतर्गत ८२ दूरशिक्षण संस्था , मानीव विद्यापीठे व खासगी संस्था अशा एकूण २५६ संस्था कार्यरत आहेत. या सर्व संस्थांमध्ये सुमारे ५० लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यापीठांची संख्या देशातील पारंपरिक

विद्यापीठांपेक्षा अधिक आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यात — '१९८९'मध्ये '**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**' या संस्थेची स्थापना झाली. या विद्यापीठामधून दरवर्षी सुमारे ७ लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. तसेच महात्मा गांधींच्या तत्वज्ञानानुसार ग्रामीण भारताचा सामाजिक-आर्थिक विकास साधण्यासाठी एका नमुनेदार ग्रामीण विद्यापीठाच्या निर्मितीचाही पुरस्कार सदर धोरणामध्ये केला गेला आहे. १९९२ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने 'जनार्दन रेड्डी' यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक धोरणाचा पुनर्विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीने **'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९६ '** (१९९२ सा लाच्या बदलांसह) प्रसिद्ध केले होते. भारताचे तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या किमान समान कृतिशील कार्यक्रमाधारित **२००५ मध्ये नवे शैक्षणिक धोरण** आखले गेले. त्यामध्ये व्यावसायिक व तांत्रिक कार्यक्रमांसाठी देशभरात समान प्रवेश परीक्षा सुरू केली. **१८ ऑक्टोबर २००१ च्या भारत शासन निर्णयान्वये जेईई, एआयईई (राष्ट्रस्तरीय) आणि एसएलईई** या तीन परीक्षायोजना आखल्या गेल्या. त्यामुळे बदलते प्रवेश-अटी असताना व्यावसायिक स्तर राखण्याची दक्षता घेणे सोपे झाले. तसेच आशय पुनरावृत्ती , अनेक प्रवेश परीक्षांना सामोरे जाणे , मनोकायिक व आर्थिक बोजा विद्यार्थी-पालकांवर पडणे इत्यादी बाबींपासून सुटका झाली. त्यानंतर २००९ मध्ये मनमोहन सिंग यांनी निरक्षर व नवसाक्षरांसाठी (१५ वर्षीय व त्यापेक्षा मोठ्यांकरिता) ही केंद्र शासनपुरस्कृत शैक्षणिक योजना सुरू केली. २००१ च्या जनगणनेनुसार १२.७ कोटी भारतीय प्रौढ साक्षर झाले. त्यांपैकी ६०% स्त्रिया, २३% अनुसूचित जाती आणि १२% अनुसूचित जमाती या योजनेचा लाभ घेऊन साक्षर झाले आहेत.

'राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान — ' (आरयूएसए) ही राज्याच्या उच्च शिक्षणात सुधारणाकरिता वास्तू उभारणीसाठी नियोजन व नियंत्रण करणारी मोहीम केंद्र शासनाने — **२०१३** मध्ये सुरू केली. त्यामध्ये राज्यातील दर्जेदार विद्यापीठ व महाविद्यालयांना स्वायत्तता देऊ केली. या अभियानाने परीक्षा सुधारणा अपेक्षित होते. तसेच भारतीय विद्यापीठ व विदेशी विद्यापीठांमध्ये शैक्षणिक प्रगतीसाठी संवाद साधणे गरजेचे आहे असे म्हटले गेले आहे.

2002 मधील 86 व्या घटनादुरुस्तीने मूलभूत अधिकारांच्या कलम 21-ए अंतर्गत शिक्षणाला अंमलबजावणीचा हक्क बनविला. ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी **'राईट टू एज्युकेशन (आरटीई),२००९'** लागू करण्यात आला आहे. या अधिनियमात 'सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय' यासारख्या सरकारी उपक्रमांत समाजातील वंचित घटकांसाठी २५% आरक्षण देण्यात आले आहे.

२०१४ नंतर विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्वीच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आढावा घेण्यासाठी २०१६ मध्ये माजी केंद्रीय सचिव टी.एस.आर.सुब्रमाण्याम यांच्या

अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय धोरण समिती' नेमली. या समितीने पूर्वीच्या शासकीय योजनांचा आढावा घेतला: District Primary Education Program (DPEP), सर्वशिक्षा अभियान(SSA,2001), Right to Education(RTE), National Program for Girls at Elementary Level(NPEGEAL), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान(RMSA,2009), माध्यमिक स्तरावर अपंगांसाठी Inqulziv Education For The Disable For Secondary Stage(IEDSS), प्रौढ साक्षर भारत(ADULD EDUCATION INDIA होते. **New National Education Policy 2020 / नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०** धोरणासाठी पुन्हा दुसरा प्रयत्न माजी **'इस्त्रो अध्यक्ष के. कस्तुरीरंगन'** यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्येक्षतेखाली नेमलेल्या आयोगाने काही बदल सुचवलेले होते. या बदलाचे फलित म्हणजे **'नवे शैक्षणिक धोरण 2020!'** नवे शैक्षणिक धोरण हे भविष्याचा वेध घेणारे असेल.ही शिक्षणपद्धती भारतीयांनी इतिहासात केलेल्या अभूतपूर्व कामगिरीचा परिचय करून देणारी आणि भविष्याचा वेध घेणारी असेल.

काय आहे या धोरणात हे आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करूयात :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची वैशिष्ट्ये : सुमारे ३४ वर्षांनंतर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये बदल करण्यात आ ला असून भाषा व व्यवसाय शिक्षणामध्ये वैशिष्ट्यपूर्ण बदल करण्यात आले आहेत. ह्या धोरणातील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे :

- कोणत्याही विद्यार्थ्यावर कोणतीही भाषा लादली जाणार नाही.
- 'एक भारत श्रेष्ठ भारत' या उपक्रमांतर्गत इयत्ता सहावी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना 'भारतातील भाषा' या प्रकल्पामध्ये सहभाग घेता येणार आहे.
- विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण स्तरावर विविध विदेशी भाषांचा पर्याय दिला जाणार आहे.
- सुमारे ८ भारतीय भाषांमध्ये इ-कोर्सेस उपलब्ध होणार आहेत.
- शिक्षण विभागाद्वारे पाली, पर्शियन आणि प्राकृत भाषांसाठी एक राष्ट्रीय संस्था उभारली जाणार आहे.
- पूर्वप्राथमिक शाळांसाठी एनसीइआरटीकडून अभ्यासक्रम आखला जाणार असून हा अभ्यासक्रम देशातील सर्व पूर्व प्राथमिक शाळांना लागू करताना पूर्वप्राथमिक शिक्षण आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्याचे प्रयत्न असेल.
- इयत्ता तिसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना संख्या व अक्षरांची ओळख होऊन त्यांना ते वाचता येईल, यावर भर देत यापुढे हेच मुलभूत शिक्षण म्हणून मानले जाणार आहे.

- ज्या ठिकाणी अंगणवाडी आणि पूर्व प्राथमिक शाळा नवीन अभ्यासक्रम राबविण्यात अपयशी ठरणार आहेत, त्या सर्व ठिकाणी विविध सुविधांसह स्वतंत्र पूर्वप्राथमिक शाळा उभारली जाणार आहे.
- सरकारी व खाजगी शाळांमधील शिक्षणात समानता असणार आहे.
- यापूर्वीच्या धोरणामध्ये '६ ते १४ वर्षे' वयोगटातील मुले 'विद्यार्थी शिक्षण हक्क' कायद्याच्या कक्षेत येत होते; मात्र नवीन धोरणानुसार '३ ते १४ वर्षे' असा वयोगट करण्यात आला आहे.
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी भारतीय सांकेतिक भाषा संपूर्ण देशात प्रमाणित करण्यात येणार आहे.
- नवीन धोरणानुसार शालेय निकाल पत्रकावर गुण, श्रेणी व शिक्षकांचां शेरा यांव्यतिरिक्त त्यामध्ये स्वतः विद्यार्थी व वर्गमित्र यांचाही शेरा असणार आहे.तसेच शिक्षणाबरोबर विद्यार्थाचे जीवन कौशल्यसुद्धा नमूद करावे लागणार आहे.
- पूर्वीच्या धोरणानुसार दहावी आणि बारावी या दोन बोर्डाच्या परीक्षा घेतल्या जात होत्या. मात्र आता नवीन धोरणानुसार इयत्ता नववी ते बारावीपर्यंतच्या परीक्षा वर्षातून एकदा न घेता, त्या एकूण ८ शालेय अर्धवर्षांमध्ये (सेमीस्टर) विभागून घेण्यात येणार आहे.
- पूर्वीच्या धोरणानुसार विद्यार्थ्याला दहावीनंतरचे शिक्षण कला, वाणिज्य व विज्ञान यांपैकी कोणत्याही एकाच शाखेत प्रवेश मिळून त्याला त्याच शाखेतील विषय शिकविले जात होते; नवीन धोरणात बदल केले असून विद्यार्थ्याला एखाद्या शाखेत प्रवेश घेऊन दुसऱ्या शाखेतील आवडीचे विषय उदा: कला शाखेत प्रवेश घेऊन विज्ञान शाखेतील जीवशास्त्र किंवा वाणिज्य शाखेतील सहकार इत्यादी विषय घेता येणार आहे.
- या धोरणांतर्गत शालेय शिक्षण, उच्च शिक्षण यांबरोबरच कृषी, वैद्यकीय, कायदा, तांत्रिक - शिक्षण इ. व्यावसायिक शिक्षणाला कार्यक्षेत्रात आणले आहे.
- देशातील महाविद्यालयांना श्रेणी देण्यासाठी 'उच्च शिक्षण नियामक' ही संस्था स्थापली जाणार आहे.
- नवीन शैक्षणिक धोरणानुसार विदेशी विद्यापीठांना भारतामध्ये आपल्या शाखा उघडता येणार आहे.
- शालेय शुल्क आकारणी रक्कम निश्चित केली जाणार आहे.
- सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, लिंग, अपंगत्व इत्यादी घटकांमध्ये भेदभाव न करता आर्थिकदृष्ट्या वंचित गटांवर विशेष भर दिला जाईल.
- शिक्षकांची भरती सक्षम पारदर्शक प्रक्रियेद्वारे केली जाऊन बहुस्रोत नियमित कामगिरी मूल्यांकन, उपलब्ध प्रगतीचे मार्ग इत्यादी गुणवत्तेवर आधारित शिक्षकांना 'शैक्षणिक प्रशासक' म्हणून बढती दिली जाईल.

- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी आणि एसईडीजी या प्रवर्गांतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस प्रोत्साहन दिले जाईल; तसेच 'राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा' विस्तार करून शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचा मागोवा घेतला जाईल.
- धोरण तयार करताना कोविड-१९ चा प्रसार लक्षात घेऊन पर्यायी शैक्षणिक पध्दतींचा व्यापक विचार करण्यात आला. त्यानुसार सर्वंकश 'महाजालकावरील (Internet) शिक्षण' आणि 'डिजिटल शिक्षण' या पर्यायी शैक्षणिक सज्जतेची सुनिश्चिती केली जाणार आहे.



नवीन शैक्षणिक धोरण महत्वाचे मुद्दे :

१. शालेय शिक्षण
२. उच्चशिक्षण
३. शिक्षक शिक्षण
४. व्यावसायिक शिक्षण
५. प्रौढ शिक्षण
६. भारतीय भाषांना चालना
७. राष्ट्रीय शिक्षण आयोग
८. राष्ट्रीय संशोधन फाऊंडेशन

पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली **'राष्ट्रीय शिक्षण आयोग '** किंवा **'NATIONAL EDUCATION COMMITTEE'** स्थापना करण्यात येईल. हा आयोग भारतातील शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक (कस्टोडियन) असेल.

१. शालेय शिक्षण:

a. प्रारंभिक बाल्यावस्था निगा व शिक्षण यांचे सबलीकरण -

उद्देश: सन २०२५ पर्यंत ३-६ वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत, सुरक्षित, उच्च दर्जायुक्त, विकासात्मकदृष्ट्या योग्य शिक्षण प्रदान करणे.

- स्थानिक गरजा, भौगोलिकता व विद्यमान पायाभूत सुविधा यांबाबत बहुआयामी दृष्टिकोन ठेवल्यास प्रारंभिक – बाल्यावस्थेतील शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुविधांचा महत्त्वपूर्ण विस्तार आणि सबलीकरण होईल.
- विशेषतः सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित असलेले जिल्हे/ठिकाणे यांच्याकडे विशेष लक्ष पुरविले जाईल.
- ३-६ वयोगटातील सर्व मुलांसाठी मोफत व सक्तीचे दर्जेदार शिक्षण उपलब्ध होत असल्याची दक्षता घेण्यासाठी ' — **शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९' (The Right Education Act,2009)** चा विस्तार करण्यात येईल.

b. सर्व मुलांना पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता -

उद्देश: सन २०२५ पर्यंत इयत्ता पाचवी व त्यापुढील इयत्तांतील प्रत्येक विद्यार्थास पायाभूत साक्षरता व अंकज्ञान आत्मसात होणे.

- पोषण व अध्ययन एकमेकांशी घनिष्टपणे संबधित आहेत त्यामुळे माध्यान्ह भोजन कार्यक्रमाचा विस्तार करण्यात येईल.
- इयत्ता पहिलीमधील सर्व विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांचा कालावधी असलेला 'शालेय पूर्वतयारी अभ्यास' आयोजित करण्यात येईल.
- प्रत्येक शालेय स्तरावर विद्यार्थी - शिक्षक यांचे गुणोत्तर ३०:१ असे राहील, याची खात्री करण्यात येईल.

c. सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षणप्रवाहात टिकवून ठेवणे -

उद्देश: सन २०३०पर्यंत ३-१८ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शालेय शिक्षणास प्रवेश मिळून शिक्षणामध्ये त्यांचा सहभाग वाढवणे.

मुलांचा शाळेमध्ये होणारा प्रवेश वाढत असला तरी यथावकाश मुलांची शाळेतून होणारी गळती आपल्याला थांबविता येत नसल्याबद्दल हे धोरण चिंता व्यक्त करते.

- सन २०३०पर्यंत विविध उपाययोजनाच्या माध्यमातून शालेयपूर्व काळापासून ते माध्यमिक शिक्षणापर्यंत १००% ग्रॉस एनरोलमेंट रेशो साध्य करावयाचा आहे.
- शाळेतील मुलांच्या भरतीच्या संख्येत वाढ करणे, ज्या ठिकाणी शालेय सेवा आजवर देता आलेली नाही किंवा कमी प्रमाणात उपलब्ध आहे अशा ठिकाणी नवीन सुविधा विकसित करणे, सर्व विद्यार्थ्यांसाठी, विशेषतः मुलींसाठी - संपूर्ण सुरक्षेची हमी देऊन शाळेत ये-जा करण्यासाठी दळणवळण सेवा व वसतिगृहाची सेवा आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देणे, अशा वेगवेगळ्या उपयायोजनांमधून शालेय प्रवेशाची दरी कमी करण्याचा मानस आहे.
- शिक्षणाचा अधिकार अधिनियमाचा विस्तार करून शालेयपूर्व शिक्षणापासून इयत्ता बारावीपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देण्यात येईल.

d. शालेय शिक्षणासाठी अभिनव अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र रचना -

उद्देश: घोकंपट्टी करण्यात येणारे अध्यनन कमी करून त्याऐवजी सर्वांगीण विकास आणि शोधक विचारक्षमता, सर्जनशीलता, शास्त्रीय मनन, सुसावंद, परस्परसहकार्य, बहुभाषिकता, समस्या निवारण, नीतीतत्त्वे, सामाजिक बांधिलकी व अंकीय साक्षरता अशा २१व्या शतकातील अभिनव कौशल्यांवर आधारित अध्यनाला चालना देण्यासाठी सन २०२२पर्यंत अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र यांमध्ये आमुलाग बदल करणे.

- सध्याच्या शालेय शिक्षणाचा अभ्यासक्रमाची रचना व **अभ्यासक्रमाचा आराखडा ५+३+३+४** मांडणीनुसार बनविला जाईल.
  - पायाभूत स्तर (वय ३-८ वर्षे) : शीघ्र बौद्धिक विकास, खेळ व शोधानावर आधारित अध्ययन.
  - पुढील स्तर (वय ८-११) : खेळ व शोधनबांधणी - रचनात्मक अध्ययांनाकडे संक्रमणाची सुरुवात.
  - पुढील स्तर (वय ११-१४) : विषयांमधील संकल्पना शिकणे - पौगंडावस्थेतील वाटचालीस सुरुवात.

- पुढील स्तर (१४-१८) : उदरनिर्वाह व उच्च शिक्षणाकडून - युवा प्रौढत्वाकडे संक्रमण.

➢ किमान इयत्ता पाचवी ते आठवीपर्यंत शिक्षण स्थानिक भाषेत/मातृभाषेत असेल.गरजेनुसार द्विभाषा दृष्टीकोन आणि त्रिभाषीय सूत्र अंमलात आणण्यात येईल.

e. शिक्षक - बदलाचे प्रणेते -

उद्देश: शालेय शिक्षणातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना व्यासंगी, उत्सुर्फ, उच्चशिक्षित, व्यावसायिकदृष्टया प्रशिक्षित आणि योग्य शिक्षकांकडून शिकविले जाईल, याची दक्षता घेणे.

➢ वंचित, ग्रामीण व आदिवासी भागातील हुशार विद्यार्थ्यांना गुणवत्तेवर आधारीत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येईल.

➢ सर्व शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती 'सर्वसमावेशक शिक्षक आवश्यकता नियोजन' यावर आधारीत कडक व नियमबद्ध प्रक्रियेतून केली जाईल.

➢ सन २०२२पर्यंत देशभरातून 'शिक्षक सेवक' किंवा 'पॅरा टीचर्स' प्रक्रिया बंद करण्यात येईल.

➢ प्रत्येक मुख्याध्यापक आणि/किंवा शाळेचे प्राचार्य सुदृढ शालेय विकास प्रक्रिया व साहाय्यक शालेय संस्कृती निर्माण करण्यास जबाबदार असतील.

➢ शालेय कामकाजाच्या वेळेत शिक्षकांच्या अध्यापनकार्यात कोणत्याही स्वरूपाचा व्यत्यय येता कामा नये. (उदा. माध्यान्ह भोजन बनविणे, शाळेसाठी साहित्य जमविणे इ.) उलटपक्षी, निष्कारण किंवा रजा मंजूर नसताना शाळेतून अनुपस्थित राहिल्यास शिक्षकांना जबाबदार धरण्यात येईल.

f. देशातील प्रत्येक मुलासाठी न्याय्य व सर्वसमावेशक शिक्षण -

उद्देश: जन्म व कौटुंबिक पार्श्वभूमी यांच्याशी निगडीत परीस्थितीमुळे भारतातील एकाही मूलाची शिकण्याची वा प्रगतीची कोणतीही संधी वाया जाऊ नये; तसेच सर्व मुलांना लाभदायक ठरेल अशा प्रकारची शिक्षण प्रणाली घडविणे या धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

➢ वंचित मुलांच्या बाबतीत प्रारंभिक बाल्यावस्था शिक्षण , पायाभूत साक्षरता व अंकज्ञान, शालेय उपब्धता, शालेय प्रवेश व उपस्थिती यांच्याशी निगडीत असलेल्या धोरणातील कृतींकडे विशेष लक्ष व साहाय्य पुरवले जाईल.

- या धोरणातील काही ठळक उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत:- शिक्षकांना वारंवार प्रशिक्षण देऊन त्यांचे ज्ञान व कौशल्य अद्ययावत ठेवणे , सर्वसमावेशक शालेय वातावरण निर्माण करणे , बहिष्कार टाकण्याच्या कृती बंद पाडणे, सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमांमध्ये बदल करणे.
- शालेय शिक्षक व विद्यार्थिनींमधील लिंग असमानता यावर उपाययोजना करण्यासाठी महिलांचा सहभाग वाढविणे;याकरिता मुलींना शिक्षण प्रदान करणे.शासनाने आदिवासी, जातीनिहाय व धर्मनिहाय समूहांमधील मुलांसाठी योजिलेले सर्व लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचत असल्याची दक्षता घेणे. शहरी भागातील गरीब कुटुंबामधील विद्यार्थांना योग्य जीवनमान मिळावे यासाठी प्रयत्न करणे . दिव्यांग तसेच तृतीयपंथी मुलांना शिक्षण प्रदान करणे. . यासोबतच परिसरातील शाळांमधील पायाभूत स्तरा पासून ते इयत्ता बारावीपर्यंतच्या मुख्य प्रवाहातील मुलांवर निरंतर व अधिक उमेदीने लक्ष केंद्रित करणे.

g. शालेय शिक्षणाचे विनियमन -

उद्देश: शालेय शिक्षणामध्ये सचोटी व पारदर्शकता रहावी, शैक्षणिक निष्पत्तीमध्ये निरंतर सुधारणा व्हावी या हेतूने शिक्षणप्रणालीच्या गुणवत्तेला व अभिनव उपक्रमांना चालना देण्यासाठी 'प्रभावी विनियमन व प्रमाणन (ऍक्रेडीटिशन) यंत्रणा' राबवून भारतीय शालेय शिक्षण प्रणालीमध्ये नवचैतन्य आणणे.

- संघर्ष स्वारस्य टाळता यावे या हेतूने शाळांचे विनियमन व प्रचालन (operation) स्वतंत्र समितीकडून करण्यात येईल. धोरणश निश्चिती विनियमन, प्रचालन व शैक्षणिक बाबींकरिता सुस्पष्ट आणि स्वतंत्र प्रणाली अस्तित्वात येईल.
- राज्यातील शाळांसाठी आवश्यक असलेली मानकांची रचना व अभ्यासक्रम यांच्यासह सर्व शैक्षणिक बाबी 'राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद' यांच्याकडून कार्यान्वित होतील.
- 'शिक्षणाचा अधिकार' शालेय विनियमनव अनुपालन यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा वैधानिक घटक असल्यामुळे त्याचे पुनर्विलोकन करण्यात येईल आणि सदर धोरण सक्षम करण्यासाठी व तो अधिनियम अस्तित्वात आल्यानांतर त्या पासून मिळालेल्या शिकवणीवर आधारित नियोजनात

सुधारणा अंमलात आणण्यासाठी अधिनियमामध्ये योग्य सुधारणा करण्यात येतील.

२. उच्चशिक्षण

a. नवीन संस्थात्मक पायाभूत सुविधा (Artitecure) -

उद्देश: उच्च शिक्षण प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल करणे. देशभरात जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था निर्माण करणे. सन २०३५पर्यंत ग्रॉस एनरोलमेंट रेशो किमान ५०% पर्यन्त वाढविणे.

- सध्या अ स्तित्वात असलेली ८०० विद्यापीठे व ४० ,००० महाविद्यालये सुमारे१५,००० उत्कृष्ट संस्थांमध्ये संकलितत करण्यात येईल.
- विशिष्ट उद्दे शानुरूप निर्माण करण्यात येणाऱ्या उच्च दर्जाच्या तीन प्रकारच्या संस्था अस्तित्वात येतील:
  - प्रकार १ – यामध्ये जागतिक दर्जाचे संशोधन व सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करण्यात येईल
  - प्रकार २ – यामध्ये सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करण्यासोबत संशोधनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देण्यात येईल.
  - प्रकार ३ – यामध्ये सर्व शाखांसाठी उच्च दर्जाचे अध्यापन करताना पदवीपूर्व (undergraute) शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात येईल
- सर्व संस्था विद्यापीठे असतील किंवा पदवी प्रदान करणारी स्वायत्त महाविद्यालये असतील.
- सार्वजनिक क्षे त्रातील उच्च शिक्षणाचा विस्तार आणि पुनरुज्जीवन होण्याच्या दृष्टीने अतिशय रास्त व पारदर्शक प्रणालीद्वारे सार्वजनिक क्षेत्राद्वारे मोठी गुंतवणूक करण्यात येईल.

b. उच्च दर्जाचे उदारमतवादी शिक्षण -

उद्देश: उच्च शिक्षणासाठी निवडलेल्या शाखेमध्ये,विषयामध्ये व क्षेत्रामध्ये सखोल विशेष ज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया रचण्याच्या उद्देशाने अधिक कल्पक व विस्तृत स्वरूपाच्या उदारमतवादी शिक्षणाकडे वाटचाल करणे.

- 'उदारमतवादी शिक्षण उच्च शिक्षणाचा पाया असेल.' पदवीपूर्व स्तरावर, पेशाविषयक व व्यावसायिक क्षेत्रांसह सर्व प्रकारच्या शाखांसाठी/ कार्यक्रमांसाठी व क्षेत्रांसाठी हाच दृष्टीकोन असेल.
- केंद्र शासन 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी 'च्या **(आयआयटी)** धर्तीवर दहा 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ लिबरल आर्ट्स व बहुशाखीय शैक्षणिक व संशोधन विद्यापीठांची उभारणी करेल.
- पीएच. डी. क रिता प्रवे श घेण्यासाठी पदव्युत्तर पदवी किंवा ४ वर्षांचा पदविका अभ्यासक्रम 'ऑनर्ससह पूर्ण केलेला असणे आवश्यक असेल. एम्. फिल. अभ्यासक्रम बंद करण्यात येईल.

c. अध्ययनास पोषक वातावरण निर्माण करणे -

उद्देश: अभ्यासक्रम आनंददायी, सखोल व परस्परसवांदी असेल, अध्यापनशास्त्र विद्यार्थ्यांना विषयाशी बांधून ठेवणारे,प्रभावी असेल. विद्यार्थांना अध्यपनक्रियेतून अधिकाधिक निष्पत्ती व्हावी व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी काळजी घेणारे मदतशील वातावरण राहील, याची दक्षता घेणे.

- शिक्षणाची फलश्रुती अ धिक सरस व्हावी याकरिता विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक, आर्थिक व भावनिक साहाय्य सदैव उपलब्ध राहील.
- खुले शिक्षण व दूरस्थ शिक्षण यां च्या (Distance Learning) कक्षा रुंदावण्यात येतील.
- संस्थात्मक सहकार्य, विद्यार्थी आणि अध्यापक यांच्यातील गतिशीलता याद्वारे शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण साधण्यात येईल.निवडक भारतीय विद्यापीठांमध्ये आंतरराष्ट्रीय शिक्षणासाठी 'आंतरविद्यापीठ केंद्राची' स्थापना करण्यात येईल.

d. उत्साही, सहभागी होणारे व सक्षम अध्यापक -

उद्देश: उच्च सक्षमता व दृढ बांधिलकी असलेले आणि अध्यापन व संशोधनामध्ये सर्वोत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी उत्साही असलेले सबळ अध्यापक वर्ग निर्माण करणे.

- आजवर तासिका तत्वावर, अभ्यागत किंवा कंत्राट पद्धतीने करण्यात येणारी अध्यापकांची नियुक्ती ताबडतोब बंद करण्यात येईल.
- अध्यापकांची भरती त्यांचे शिक्षणिक नैपुण्य, अध्यापनाच्या क्षमता व सार्वजनिक क्षेत्रामध्ये समाजसेवेसाठी असलेला त्यांचा कल यांच्यावर आधारित असेल.

e. विनियमनाच्या प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल -

उद्देश: उच्च शिक्षणामध्ये सर्वोत्तम कामगिरी व सामुदायिक उत्साहवर्धन होण्यास चालना मिळावी या उद्देशाने प्रभावी, सक्षम बनविणारे व परस्परसंवादी — विनियमन अस्तित्वात आणणे.

- प्रमाणन, अर्थसहाय्य, मान्यता प्राप्ती व विनियमन ही कार्ये वेगवेगळी करण्यात येतील आणि सदर कार्ये स्वतंत्र मंडळाकडून करण्यात येतील. यामुळे सत्तेचे केंद्रीकरण व स्वारस्य संघर्ष टाळता येईल.
- व्यावसायिक शिक्षणा सह सर्व प्रकारच्या उच्च शिक्षणासाठी केवळ **'राष्ट्रीय उच्च शिक्षण नियंत्रण प्राधिकरण** (नॅशनल हायर एज्युकेशन रेग्युलेटरी ऑथॉरिटी) ही एकच नियंत्रण यंत्रणा असेल.
- शासकीय व खाजगी उच्च शिक्षण संस्थासाठी एकच सामायिक नियंत्रण पद्धती असेल.

३. शिक्षक शिक्षण

a. शिक्षकांची कसून पूर्वयारी

उद्देश: शिक्षक शिक्षण प्रणालीमध्ये आमूलाग्र बदल करून बहुशाखीय महाविदयालांमध्ये व विदयापीठांमध्ये 'शिक्षक शिक्षण प्रणाली' राबवणे आणि सर्व शालेय शिक्षकांसाठी चार वर्षांचा एकीकृत केलेला 'बॅचलर पदवी अभ्यासक्रम' अस्तित्वात आणून शिक्षकांना साहित्य, अध्यापनशास्त्र व सराव यांमध्ये सर्वोच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले जात असल्याची दक्षता घेणे.

अध्यापन हा नैतिकदृष्या व बौद्धीकदृष्या अतिशय आव्हानात्मक व्यवसाय आहे.

- चार वर्षांचा बी. एड्. अभ्यासक्रम इतर पदवीपूर्व पदवीसमान असेल. चार वर्षांचा बी.एड्. अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास पात्र राहतील.
- सध्याचा दोन वर्षांचा बी. एड्. अभ्यासक्रम सन २०३० पर्यंत कायम राहील. सन २०३० नंतर केवळ चार वर्षांचा बी.एड्. अभ्यासक्रम प्रदान करणाऱ्या संस्थांनाच दोन वर्षांचा अभ्यासक्रम प्रदान करता येईल.
- "शिक्षक शिक्षण केवळ बहु—शाखीय संस्थामध्येच प्रदान करण्यात येईल." शैक्षणिक दृष्टीकोन,विषय व अध्यापनशास्त्र यांच्या सखोल सैधांतिक आकलनासाठी ,तसेच सैधांतिक ज्ञान व प्रात्यक्षिक ज्ञान यांच्यातील परस्परमेळ दृढ होण्यासाठी शिक्षणाच्या मुख्य क्षेत्रांमध्ये व इतर सर्व शैक्षणिक विषयांमध्ये विविध तऱ्हेचे विशेषज्ञ उपलब्ध असणे व एकमेकांशी जोडलेल्या शाळा उपलब्ध असणे, ही काळाची गरज आहे.

४. व्यावसायिक शिक्षण

उद्देश: शाळा,महाविद्यालय,विद्यापीठे सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्थामध्ये व्यावसायिक शिक्षणाचा समावेश करणे. सन २०२५ पर्यंत सर्व शिकाऊ विद्यार्थ्यांपैकी किमान ५०% विद्यार्थ्यान व्यावसायिक शिक्षणाचा लाभ देणे.

व्यावसायिक शिक्षणाला उच्च शिक्षणामध्ये पुनःएकीकरण करणे आणि व्यावसायिक शिक्षणाचे पुनरुत्थान करणे.

- व्यावसायिक शिक्षण एकंदर उच्च शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग असेल.
- येथून पुढे स्वतंत्र/एकएकटी तांत्रिक विद्यापीठे, आरोग्यशास्त्र/वैद्यकीय विद्यापीठे, विधी व कृषी विद्यापीठे किंवा या आणि अशा इतर क्षेत्रातील संस्थाची उभारणी बंद करण्यात येईल.
- कृषी शिक्षणाचे त्याच्या संलग्न शाखांसोबत पुनरुज्जीवन करण्यात येईल. कृषी शिक्षण प्रदान करणाऱ्या संस्थाचा तेथील स्थानिक समुदायांना थेट लाभ झाला पाहिजे यावर भर देण्यात येईल.

- विधी शिक्षणाच्या कार्यक्रमाची पुर्नरचना करण्यात येईल. न्यायाची कवाडे सर्व सामान्यांना सहजरित्या उघडी असावीत व न्याय निवाडा दीर्घकाळ रखडत न राहता वेळेवर न्याय मिळावा याकरिता विधीक्षेत्रातील व्यावसायिक शिक्षण जागतिक स्तरावर स्पर्धात्मक आणि सर्वोत्तम कार्यपद्धती व नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारणारे असले पाहिजे.
- आरोग्यसेवा शिक्षणामध्ये महत्वपूर्ण बदल करण्यात येतील. या क्षेत्राशी निगडीत व्यक्ती जी भूमिका पार पाडतात त्यानुसार आरोग्यसेवा अभ्यासक्रमाचा कालावधी , रचना व आखणी करण्यात येईल. नर्सिंग शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात येईल . नर्सिंग व इतर उपशाखांसाठी **'एक राष्ट्रीय मान्यता समितीची (नॅशनल ऍक्रेडीटेशन बॉडी)'** स्थापिण्यात येईल.
- तांत्रिक शिक्षणापुढे विशिष्ट आव्हाने आहेत. कारण या शाखा पूर्णतः ज्ञानाधिष्ठित, संपूर्णपणे कौशल्याधिष्ठित नाहीत. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या कार्यक्रमांमध्ये सुधारणा करण्यात येतील. विविध, बहुतांश वेळा अनोळखी बाबतीत आपले ज्ञान व कौशल्ये वापरण्याची आणि व्यावसायिक विचारसरणी व नीती तत्वे आत्मसात करण्याची क्षमता विदयार्थ्यांमध्ये विकसित व्हावी याकरिता अभ्यासक्रमाचे पुनरुज्जीवन करण्यात येईल. नवीन व उदयोन्मुख अभ्याशाखांच्या-उदा. आर्टिफिशियल, इंटिलेजन्स, बिगडेटा ऍनॅलिसिस , इत्यादींच्या समावेशाबद्दल व्यूहरचनात्मक भर देण्यात येईल.

५. प्रौढ शिक्षण

उद्देश: सन २०३०पर्यंत युवा व प्रौढ साक्षरता दर १००% पर्यंत आत्मसात करणे आणि प्रौढ शिक्षण व इतर शैक्षणिक उपक्रम/कार्यक्रम यांचा लक्षणीयदृष्या विस्तार करणे.

साक्षरता व मूलभूत शिक्षण व्यक्तिगत, नागरी, आर्थिक व आजीवन अध्ययन संधींमधील व्यक्तीचा सहभाग सक्षम करणे – हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. तथापी, आपल्या युवा व प्रौढ लोकसंख्येचा अविश्वनीय वाटेल इतका मोठा हिस्सा अद्यापी निरक्षर आहे.

- पुढील पाच व्यावसायिक कार्यक्षेत्राच्या दृष्टीने प्रौढ शिक्षणासाठी **'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (NATIONAL QURIKALAM FREMWORK)'** विकसित करण्यात येईल . " मूलभूत साक्षरता व अंकज्ञान, अत्यावश्यक जीवन कौशल्ये, व्यावसायिक कौशल्ये, मूलभूत शिक्षण व निरंतर शिक्षण."
- प्रत्येक साक्षर सदस्याला किमान एका निरक्षर व्यक्तीला वाचायला शिकविण्यास प्रवृत्त करणे. तसेच स्त्री साक्षरतेवर विशेष भर देण्यात येईल.

६. भारतीय भाषांना चालना

उद्देश: सर्व भारतीय भाषांचे संवर्धन, वृद्धी व चैतन्य अबाधित राखले जाईल याची दक्षता घेणे.

आदिवासी भाषांसह सर्व भारतीय भाषांना जेव्हा योग्य सन्मान दिला जाईल तेव्हाच देशातील प्रत्येक प्रदेशाच्या संस्कृतीचे व परंपरांचे खऱ्याअर्थी अंर्तभावाची व संवर्धनाची पूर्तता होईल.

- देशभरातून भारतीय भाषा व साहित्य यांचे सक्षम कार्यक्रम राबविणे, भाषा शिक्षकांची व अध्यापकांची भरती, एकाग्रतेने केलेले संशोधन, शास्त्रीय भाषांना चालना या उपक्रमांद्वारे भारतीय भाषा, साहित्य व शास्त्रीय शब्दकोष यांच्यावर लक्ष केंद्रित करण्यात येईल.
- "शास्त्रीय भाषा व साहित्य यांना चालना देण्याकरिता अस्तित्वात असलेल्या विद्यमान राष्ट्रीय संस्थाचे सबलीकरण करण्यात येईल. " पाली, फारसी व प्राकृत भाषांसाठी **'राष्ट्रीय संस्थे'**ची स्थापना करण्यात येईल.
- देशभरातून एकसमान विनीयोगाकरिता उपयुक्त ठरावे या हेतूने एक शब्दकोष विकसित व्हावा याकरिता अस्तित्वात असलेल्या **'शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा आयोगा'**च्या उपक्रमाचे नूतनीकरण करण्यात येईल. त्यामध्ये केवळ भौतिक शास्त्रांचाच नव्हे तर सर्व शैक्षणिक विषयांचा, शाखांचा व क्षेत्रांचा समावेश करण्यास्तव त्याचा व्यापक स्वरूपात विस्तार करण्यात येईल.

७. राष्ट्रीय शिक्षण आयोग

शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल:

उद्देश: एका नव्या राष्ट्रीय शिक्षण आयोगाच्या अधिपत्याखाली दूरदृष्टीपासून अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक बाबतीत सर्व स्तरांवर न्याय्यता व सर्वोत्तमता देण्यासाठी भारतीय शिक्षण प्रणाली परस्परसहयोगाने कार्यान्वित करणे.

- पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च समिती या नाते **'राष्ट्रीय शिक्षण आयोग'** किंवा **'The National Education Commission'**ची स्थापना करण्यात येईल.
- 'केंद्रीय शिक्षण मंत्री' या आयोगाचे 'उपाध्यक्ष' राहतील आणि आयोगाच्या दैनंदिन कामकाजासाठी थेट जबाबदार राहतील.
- हा आयोग भारतातील शिक्षणाचा परिक्षक (कस्टोडीयन) असेल. हा आयोग आपल्या समाजातील वैविध्याचे जतन करताना शिक्षणाबाबत **'एकीकृत राष्ट्रीय दूरदृष्टी'** निर्माण करेल.
- कामकाजातील समन्वय व सुसूत्रता अबाधित राखण्यासाठी सदर आयोग सर्व राज्यांसोबत बारकाईने व दक्षतेने कार्यरत राहील. राज्यशासन आवश्यकतेनुसार राज्य स्तरीय उच्च समिती नेमू शकतील. अशा समितीचे नाव **'राज्य शिक्षण आयोग'** किंवा **'The State Education Commission'** असे असेल.

८. राष्ट्रीय संशोधन फाऊंडेशन

दर्जेदार शैक्षणिक संशोधनाचा यथार्थ विनियोग करणे.

उद्देश: विद्यापीठे व महाविदयालयांमध्ये संशोधनाचे बीजारोपण होऊन त्याची वृद्धी व्हावी या हेतूने देशभरातील सर्व शैक्षणिक शाखांमध्ये संशोधन व नवकल्पना याबाबत चालना देणे– स्पर्धात्मक सहयोग-पुनर्विलोकनाद्वारे करण्यात येणारा अर्थ पुरवठा, मार्गदर्शन व सुलभीकरण यांमधून संशोधनासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

- संसदेमध्ये कायदा संमत करून भारत सरकारची एक स्वायत्त संस्था या अर्थी **'National Research Foundation'**ची स्थापना करण्यात येईल.

- या फाऊंडेशनच्या प्राथमिक आवाक्यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल:
    - शैक्षणिक क्षेत्रांमध्ये सर्व शाखां – मध्ये होत असलेल्या संशोधनास स्पर्धात्मक, सहयोग-पुनर्विलोकन पद्धतीद्वारे अर्थ पुरवठा करणे.
    - देशभर शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधन क्षमतेची बांधणी करणे.
    - संशोधक, शासन व उद्योगजगत यांदरम्यान लाभदायी नातेसंबंध निर्माण असे करणे, की निकडीच्या राष्ट्रीय समस्यांबाबत प्राधान्याने संशोधन होईल. संशोधनातून निष्पन्न झालेल्या अभिनव उपाययोजना सर्वसामान्य जनतेच्या लाभार्थ राबवून त्यांच्या समस्यांचे निवारण करणे.
- या फाऊंडेशनमध्ये प्रारंभी चार प्रमुख विभाग असतील – **विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्रे आणि कला व मानव विज्ञान**.

विशाल व चैतन्यमय अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी व ती टिकविण्यासाठी, समाजाचा दर्जा उंचाविण्यामध्ये तसेच राष्ट्राला अत्युच्च काम गिरी करण्यास प्रेरित करण्यामध्ये संशोधन व नवकल्पना अतिशय मध्यवर्ती भूमिका बजावतात. वातावरण, तंत्रज्ञान, लोकसंख्येचे चलन अशा गोष्टींमध्ये जगभर झपाट्याने होत असलेल्या बदलांमुळे कणखर व सशक्त संशोधन प्रणाली असित्वात असणे अतिशय महत्त्वाचे झाले आहे.

नवीन शैक्षणिक धोरणातील अमंलबजावणीसाठी नेमलेल्या समिती **(committee):**

- National Education Committee.
- National Higher Education Regulatory Authority.
- National Accreditation Body.
- National Curriculum Framework.
- The State Education Commission.
- National Research Foundation.

निष्कर्ष :

"गरीब व श्रीमंत शिक्षणातील विषमता ही नवीन शैक्षणिक धोरणात विचारत घेतली आहे."त्यामुळे सरकारी व खासगी शाळेमध्ये शिक्षणात सामनता आणायची भूमिका प्रामुख्याने मांडण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरणाचा मुलांना आणि तरुणांना खूप फायदा होईल.यामुळे 'रॉट बाय पास ' करण्याची प्रवृत्ती नाहीशी होईल. नवीन शैक्षणिक धोरण आणण्याचा प्रामुख्याने येणाऱ्या पिढीचे भविष्य उज्वल करावे हाच उद्देश आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार **'दूरस्थ शिक्षण'** आणि **'ऑनलाइन शिक्षणा'**ला चालना दिली जाणार आहे. **'अकादमी बँक ऑफ क्रेडिट '** तयार केली जाईल ; ज्यामध्ये विद्यार्थ्यांची कामगिरी डिजिटल रेकॉर्डच्या स्वरूपात ठेवली जाणार आहे.येत्या काळात बेरोजगारी हटवण्यात नवीन शिक्षण पद्धती निश्चितच यशस्वी होईल. नवीन शैक्षणिक धोरण मुले आणि तरुणांना नवीन मार्ग आणि प्रकाशाकडे घेऊन जाईल , तसेच रोजगाराभिमुख शिक्षण देईल. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावर ६ % खर्च व्हावा असे आवर्जून म्हटले आहे. मागील ३८ वर्षात शिक्षणाची सुमार गुणवत्ता , पदवीधारकांच्या हाती कौशल्ये नसणे , शिक्षणामध्ये गळतीचे प्रमाण, शिक्षकांच्या योग्य मूल्यमापनाची प्रक्रिया नसणे , या सर्वच बाबींचा नवीन शैक्षणिक धोरण आणताना विचार करून प्रत्येक घटकाचा सांगोपांग विचार करण्यात आला आहे. "ज्याला जसे हवे तसे, ज्या भाषेत हवे तेव्हा भाषेत, जे शिकायची इच्छा असेल, ते हवे तेव्हा हवे तेथून शिकता आले पाहिजे, " हा नव्या शिक्षण प्रक्रियेचा मूलमंत्र असावा. त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने तशा सुविधा पुरवाव्यात इतकीच इच्छा आहे.

:संदर्भ:

१. मराठी विश्वकोश

२. महाराष्ट्र टाइम्स

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ मसुदा

४. vikaspedia